वर्ष-०८ | अंक-०३ | मुंबई, मंगळवार ०७ ते १३ डिसेंबर २०२१ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक


PG 2
पत्नी व मुलाची हत्या करून पतीची आत्महत्या, नेमकं काय घडलं ज्याने संपूर्ण नांदेड हादरलं?

3 → भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रेरणादायी सर्वोत्तम स्मारक नवी मुंबईत

परमबीर सिंह यांना अटकेची धाकधूक, सुप्रीम कोर्टाकडून मुदतवाढ मिळणार? ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## "महाराष्ट्र सरकारने तपास सुरु ठेवावा पण....''; सुप्रीम कोर्टाचा परमबीर सिंग यांना दिलासा



परमबीर सिंग प्रकरणी सुप्रीम कोर्टात झालेल्या सुनावणीदरम्यान एसजी तुषार मेहता यांनी सीबीआयची बाजू मांडली आणि आमच्याकडे प्रतिवाद करण्यासारखे काही नाही, असे सांगितले. "महाराष्ट्र सरकारने प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. डीजीपी संजय पांडे यांनीही याप्रकरणात त्यांचे उत्तर दाखल केले आहे, परंतु सीबीआयकडून अद्याप उत्तर आलेले नाही," असे परमबीर सिंग यांच्या वतीने सांगण्यात आले आहे. दरम्यान, महाराष्ट्र सरकारने

...पान २ वर...

## शिवसेना मोठा निर्णय घेण्याची शक्यता; राहुल-प्रियांकांना संजय राऊत भेटणार



- शिवसेना राष्ट्रीय स्तरावर मोठा निर्णय घेण्याची शक्यता.
- संजय राऊत राहुल व प्रियांका गांधी यांची घेणार भेट.
- पाच राज्यांच्या निवडणुकीआधी शिवसेना यूपीएत?

नवी दिल्ली: राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीएतून बाहेर पडल्यानंतर गेल्या दोन वर्षांपासून राष्ट्रीय पातळीवर कोणत्याच आघाडीचा घटक नसलेला शिवसेना हा पक्ष लवकरच संयुक्त पुरोगामी आघाडीत सहभागी होण्याची शक्यता आहे. यासाठी शिवसेनेने आपले मन बनवले असून शिवसेना नेते व खासदार संजय राऊत हे काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांची भेट घेऊन त्यांच्याशी याबाबत चर्चा करणार असल्याचे कळते. या भेटीत राऊत हे शिवसेना पक्षप्रमुख व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची यूपीएबाबत नेमकी भूमिका काय आहे, हे राहुल व प्रियांका यांना सांगतील, असेही बोलले जात असून ही बैठक सकारात्मक झाल्यास येत्या काही दिवसांत राष्ट्रीय राजकारणातील मोठी

...पान २ वर...

## वरळी सिलेंडर स्फोटात बाळाच्या मृत्यूनंतर वडिल आणि आईनेही सोडला जीव, मुंबई हळहळली

मुंबई, मुंबईतील वरळी परिसरातील कामगार वसाहतीमध्ये एका घरात गॅस सिलेंडरचा स्फोट होवून 4 जण भाजले होते. जखमींवर मुंबई सेंट्रल स्थित नायर रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल केले असता 3 दिवसांपूर्वी लहान मुलाचा मृत्यू झाला होता. त्यानंतर आज त्याच्या आई-वडिसांनी सुद्धा अखेरचा श्वास घेतला.



*बीडीडी चाळीतील एका खोलीमध्ये 30 नोव्हेंबर गॅस सिलेंडरचा स्फोट झाला होता. यामध्ये चार महिने वय असलेल्या एका बाळासह चौघे जण भाजले होते.*

वरळीतील गणपतराव जाधव मार्गावर स्थित कामगार वसाहतीत बीडीडी चाळीतील एका खोलीमध्ये 30 नोव्हेंबर गॅस

...पान २ वर...

## आजीचा खून करून 7 वर्षांपासून फरार असलेल्या नातवास अखेर पोलिसांनी केले जेरबंद

अंधेरी : दिनांक १३/०६/२०१४ रोजी रूम नं. ०३, गणपत चाळ, अंधेरी पुर्व, ह्या घराचा दरवाजा बाहेरून कुलूप लावुन बंद सुन रूमच्या आत मधून दुर्गंधी येत असल्याची तक्रार दत्ताराम मारोती वाघमारे. यांनी पवई पोलीस ठाणे येथे केली होती पोलिसांनी घटनास्थळी जावून बघितले असता त्याठिकाणी वृध्द महिला शशीकला मारोती वाघमारे, वय ७५ वर्षे, हीचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत घरामध्ये मिळून आला. मृत महिलेचा शवविच्छेदन अहवाल व पवई पोलीस ठाणे यांनी केलेला तपासात सदर वृध्द महिलेच्या अंगावरील दागीने चोरी करून तिचा गळा दाबुन खुन केल्याचे निष्पन्न झाले.

...पान २ वर...



## गायींची कत्तल करून गोमांस विकणारी टोळी पालघर पोलिसांनी केली गजाआड

पालघर : पोलीस अधीक्षक पालघर मा.श्री. दत्तात्रय शिंदे, यांना दिनांक १/१२/२०२१ यावेळी गुप्त बातमीदाराकडून बातमी मिळाली कि गुजरात बाजुकडून येणारा ट्रक कंटेनर यामध्ये गोमांस असून तो ट्रक मुंबई बाजूकडे जात आहे अशी माहिती मिळाल्यावर त्यांनी पोलीस उप निरीक्षक श्री. आशिष पाटील, स्थानिक गुन्हे शाखा बोईसर युनिट यांना त्याबाबत शहानिशा करण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे पोलीस उप निरीक्षक श्री. आशिष पाटील, यांनी पशु वैद्यकिय अधिकारी ग्रामीण रुग्णालय, कासा श्री. धनंजय धुम व पंच यांचेसह अहमदाबाद-मुंबई महामार्गावरील चारोटी नाका



येथील हिमाचल-पंजाब ढाबासमोर सापळा रचून ट्रक थांबवला त्यानंतर पंचनामा करुन पंचासमक्ष पशु वैद्यकिय अधिकारीग्रामीण रुग्णालय, कासा यांचेमार्फतीने मटणाचे नमूने काढुन ते तपासणीसाठी न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा, कलीना येथे पाठविले होते.याबद्दल ताबडतोब अहवाल मिळावा म्हणून पोलीस अधिक्षक यांनी स्वत:संचालक, न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा, कलीना यांचेशी चर्चा व पत्र पाठवून विनंती केली होती. न्यायवैज्ञानिक प्रयोग शाळेकडुन मिळालेल्या अहवाल नुसार सिद्ध झाले कि हे गोमांसच आहे.


...पान २ वर...






## पेल्हार पोलीस ठाणे यांची कामगिरी - चार चाकी वाहने चोरी करणाऱ्या सराईत आरोपींना अटक.

वसई : पेल्हार पोलीस ठाण्यातील हद्दीत कठीयावाड हॉटेल च्या समोर शगफ निसार लोणबाल, वय-३२ वर्षे यांनी



आपली महिंद्रा कंपनीची बोलेरो हि गाडी उभी ठेवलेली होती ती दिनांक १०/११/२०२१ रोजी कुणीतरी अज्ञात चोरट्याने चोरी करुन नेली याची तक्रार दिली त्यावरून अज्ञात आरोपीवर पेल्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

...पान २ वर...




पोलीस बातमी पत्र

मुंबई

★ मुंबई, मंगळवार ०७ ते १३ डिसेंबर २०२१



# मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्रमांक २ व प्रभाग समिती क्रमांक ३ येथील सार्वजनिक शौचालयाची आयुक्त यांनी केली प्रत्यक्ष पाहणी








छायाचित्र कार-विनोद दशरथ मेढे

दिनांक ४ डिसेंबर २०२१ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्रमांक २ व प्रभाग समिती क्रमांक ३ या ठिकाणी जाऊन सार्वजनिक शौचालयाची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, शहर अभियंता शिवाजी बारकुंड, स्वच्छता अधिक्षक राजकुमार कांबळे, स्वच्छता निरीक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

प्रभाग समिती क्रमांक २ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, गणेश देवल नगर व प्रभाग समिती क्रमांक ३ येथील नवघर या ठिकाणी सार्वजनिक शौचालयाची पाहणी करण्यात आली. सार्वजनिक शौचालय पाहणी दरम्यान शौचालयाच्या स्वच्छतेला अधिक महत्व देण्याचे निर्देश आयुक्त यांनी दिले. शौचालयातील दरवाजे दुरुस्ती, कुंड्या दुरुस्ती, शौचालय इमारतीची रंगरंगोटी करण्याचे निर्देश आयुक्त यांनी बांधकाम विभागास दिले. तसेच योग्य त्या प्रमाणात पाण्याचा वापर करून नियमितपणे साफसफाई करून शौचालय परिसरातील स्वच्छता, साफसफाई नियमितपणे सुरू ठेवण्याच्या सूचना आयुक्त यांनी स्वच्छता अधिक्षक राजकुमार कांबळे यांना दिल्या. त्याचबरोबर शौचालय वापराकरिता येणाऱ्या नागरिकांसाठी पाण्याची योग्य ती सुविधा उपलब्ध ठेवण्याचे निर्देश आयुक्त दिलीप ढोले यांनी दिले.

## जुन्नरमध्ये बिबट्याच्या हल्ल्यात 21 शेळ्या ठार ; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



पुणे – पुणे जिल्ह्यात बिबट्याच्या हल्ल्याचे सत्र सुरूच आहे, जुन्नर तालुक्यातील आदिवासी भाग असलेल्या माणकेश्वर व सुकाळवेढ गावात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात 21 शेळ्या त ठार झाल्याची घटना घडली आहे. माणकेश्वर येथील हनुमंत दगडू कोरडे यांच्या 3 शेळ्या बिबट्यांनी ठार केल्या. तर मन सुकाळवेढा येथे दोन बिबट्यांनी केल्या हल्ल्यात महादू ढेंगळे याच्या तब्बल 18 शेळ्या ठार झाल्या आहेत.जुन्नर परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांच्या मनात धास्ती निर्माण झाली आहे.अनेकदा शेतात एकट्याने जाण्यास नागरिक घाबरत आहे. वन विभागाने या घटनेची दखल घेत बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली आहे. जनावरांवर हल्ला केला आता माणसाचा नंबर असल्याची भीती स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी मृत शेळ्यांचा पंचनामा केला आहे. तसेच या बिबट्याला पकडण्यासाठी वन विभागाने पिंजराही लावला आहे. या भागात वनाचे प्रमाण अधिक असल्यने इथे बिबट्यांचा वावर अधिक असल्याची माहिती वन विभागानं दिली आहे.

### पुणे जिल्ह्यात बिबट्याचा वावर अधिक

जिल्ह्यातील आंबेगाव , शिरूर ,जुन्नर , खेड या तालुक्यांमध्ये बिबट्यांचा वावर अधिक असल्याचेसातत्याने समोर येत आहे.

अनेकदा ऊस तोडणी कामगार व शेतकऱ्यांनाही बिबट्याचे दर्शन झाले आहे.

## पत्नी व मुलाची हत्या करून पतीची आत्महत्या, नेमकं काय घडलं ज्याने संपूर्ण नांदेड हादरलं?

नांदेड : चारित्र्याच्या संशयावरुन पतीने पत्नी आणि मुलाची हत्या करुन स्वतः आत्महत्या केल्याची हादरवून टाकणारी घटना नांदेडमध्ये घडली आहे. पती शांताराम सोमा कावळे (40), पत्नी सीमा शांतामन (35) व मुलगा सुजीत (11) अशी मयतांची नावे आहेत. नांदेडमधील हदगाव तालुक्यातील टाकराळा गावापासून 3 किमी अंतरावर जंगलात ही घटना घडली असल्याची माहिती भोकरचे उपविभागीय अधिकारी गोपाळ रांजणगावकर यांनी दिली आहे.

नेमकं काय घडलं?

शांतामन कावळे गेली दहा-बारा वर्षांपासून कामानिमित्त मुंबईत राहत होता. कोरोनामुळे लॉकडाऊन सुरू झाले व हे कुटुंब आपल्या हिमायतनगर तालुक्यातील टेंभी या मूळ गावी रहावयास आले. गावात मिळेल काम करुन हे कुटुंब आपली उपजीविका करीत होते. काही दिवसांपासून शांतामनच्या डोक्यात संशयाचं भूत शिरलं होतं. त्याला त्याच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय येत होता. आपल्या पत्नीचे दुसऱ्या परपुरुषाशी अनैतिक संबंध आहेत, असे सतत शांतामनला वाटत होते. त्यामुळे दोघा पती-पत्नीत नेहमीच वाद होत असत. शांतामनने 28 नोव्हेंबर रोजी मुंबईला जायचे असल्याचे पत्नीला सांगितले. त्याप्रमाणे शांतामन, त्याची पत्नी सीमा आणि मुलगा सुजीत मुंबईला जाण्यासाठी घरातून निघाले.



हे कुटुंब हदगाव तालुक्यातील टाकराळा गावापासून 3 किमी अंतरावर असलेल्या जंगलाच्या परिसरात पोहचले.

या जंगलाच्या आसपास कुठेही मानववस्ती नाही. आजूबाजूला माणसांची कुठेही हालचाल नसल्याचा अंदाज घेत शांतामनने चाकू काढला आणि पत्नी व मुलावर वार करीत त्यांची हत्या केली.

पत्नी व मुलाला मारल्यानंतर शांतामनने स्वतः झाडाला गळफास घेत आत्महत्या केली.

लाकूडतोड्याने मृतदेह पाहिले

टाकाराळा येथील एक लाकूडतोड्या जंगलात लाकडे आणण्यासाठी गेला होता. या लाकूडतोड्याला शांतामनने प्रेत फासावर लटकलेले दिसले. त्याने ताबडतोब गावात जाऊन गावकऱ्यांना, वनविभागाला आणि पोलिसांना याबाबत माहिती दिली.

## पृष्ठ १ वरुन

### "महाराष्ट्र सरकारने तपास सुरु ठेवावा

सीबीआयच्या तपासाला विरोध केला असून महाराष्ट्रासाठी आम्ही आमचा जबाब नोंदवला असल्याचे डोरिस खंबाटा यांनी सांगितले.

सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने एसजी तुषार मेहता यांना प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले. तसेच प्रतिज्ञापत्रावर तुमची काय भूमिका आहे, हे स्पष्ट करा, असेही सांगितले. तर, महाराष्ट्र सरकारच्या वतीने न्यायालयात सांगण्यात आले की, "अनेक महिने परमबीर सिंग यांनी पोलीस आयुक्तपदाचा पदभार सांभाळला. तसेच ते मंडळाचे सदस्य होते. जेव्हा त्यांना वाटले की त्यांच्यावर हल्ला होतोय, तेव्हा त्यांनी पत्र लिहून सर्व मीडियासमोर मांडले, ते व्हिसल ब्लोअर नाही." न्यायमूर्ती संजय किशन कौल यांनी सुनावणीदरम्यान सांगितले की, "तुमच्या विवेकबुद्धीनुसार कार्यालयात नियुक्ती झाल्यानंतर त्यांना अशा प्रकारे हटवता येईल का?, तसेच हे प्रकरण सीबीआयकडे सोपवायचे की नाही याचाही विचार करायला हवा. महाराष्ट्र सरकारच्या युक्तिवादावरून आम्हाला असे वाटते की या प्रकरणात अन्य कोणत्या तरी संस्थेने लक्ष घालावे." न्यायमूर्ती एसके कौल म्हणाले की, "सामान्य माणूस कोणत्या टप्प्यातून जातो हे तुम्हाला माहीत आहे. मी फक्त एका बाजूने दुसऱ्या बाजूला जाणारे संकेत पाहतो आहे." या प्रकरणी टिप्पणी करताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, "मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्याविरुद्धचा तपास अन्य एजन्सीमार्फत व्हावा, असे प्रथमदर्शनी आमचे मत आहे. महाराष्ट्र पोलिसांकडून नाही. सुप्रीम कोर्टाने महाराष्ट्र पोलिसांना परमबीर सिंग यांच्याविरोधात नोंदवलेल्या एफआयआरचा तपास सुरू ठेवण्यास सांगितले. मात्र त्या प्रकरणांमध्ये न्यायालयात आरोपपत्र दाखल केले जाणार नाही."

### आजीचा खून करून 7 वर्षांपासून फरार असलेल्या

आरोपीने गुन्हा करताना कोणत्याही प्रकारचा पुरावा न सोडल्याने नमुद गुन्हा बऱ्याच वर्षांपासुन उघडकीस आला नव्हता. सदर गुन्हयाचा संमातर तपास कक्ष -१०, मार्फत करण्यात येत होता.

प्रभारी पोलीस निरीक्षक, महेशकुमार ठाकूर यांनी मागील ०६ महिन्यापासुन सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी सपोनि धनराज चौधरी, सपोनि गणेश तोडकर, पो.ह./धारगळकर, पो.ह. /शेटे यांचे पथक स्थापन केले होते. सदर पथकाने सदर गुन्हयाचा नव्याने सुरवातीपासुन तपास सरू केला पथकाने मयताचे नातेवाईक, स्थानिक लोकांकडे वेळोवेळी चौकशी करून गुन्हयाबाबत जास्तीत जास्त माहिती गोळा केली. परंतु आरोपी अगर गुन्हयाचा नेमका हेतु याबाबत माहिती प्राप्त होत नव्हती. मयताच्या नातेवाईकांकडे सतत कौशल्यपुर्ण तपास केल्याने मयताचा नातु प्रदिप तुकाराम सोनावणे, हा कोणत्याही नातेवाईक अगर मित्र मंडळी यांच्या संपर्कात नव्हता. तसेच तो पत्नी व घर सोडून खुन झाल्याचा तारखेपासून फरार झाला असल्याचे पोलिसांना माहिती प्राप्त झाली. त्याचे सोशल मिडीया अकाउंटस तपासले असता तो सोशल मिडीयावर देखील सक्रीय नसल्याचे दिसून आले. सदर कारणांमुळे मयत महिलेचा नातु प्रदिप तुकाराम सोनावणे याच्यावर पोलिसांचा अधिकाधिक संशय बळावला.त्यावरून पोलीस आरोपीच्या मागावर होते परंतु त्याचा काही सुगावा लागत नव्हता पण काही दिवसांपवी नमुद संशयीत आरोपीताने त्याचे नातेवाईकाला सोशल मिडीया व्दारे संपर्क केल्याची माहिती पथकास प्राप्त झाली. सदर माहितीच्या आधारे आरोपीचे सोशल मिडीया अकाउट तपासले असता त्याने अकाउंट डिलीट केल्याचे समजले. परंतू आरोपीचे फोटो प्राप्त करण्यास पथकास यश प्राप्त झाले. वरीलप्रमाणे तुटपुंज्या माहितीच्या आधारे पथकाने केलेल्या तांत्रिक तपासामध्ये आरोपी कल्याण परिसरांत राहत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानंतर त्याठिकाणी रात्रंदिवस कल्याण परिसरांत आरोपीचा शोध सुरू केला असता तो रंगकाम ( पेन्टर ) चे काम करीत असल्याचे समजले. पोलिसांनी वेशांतर करून आरोपी हा कल्याण येथील नांदीवली गावांत राहत असल्याची माहिती मिळवली पथकाने स्वत:ची ओळख लपवून सतत नांदीवली परिसरांत आरोपीबाबत गोपनीय चौकशी करून त्याचा मोबाईल नंबर प्राप्त केला. आरोपीचा मोबाईल क्रमांक मरोळ अंधेरी येथील पत्त्यांवर रजिस्टर असल्याने तसेच तो अनोळखी कॉल स्विकारत नसल्याने शोध घेणे पोलीस पथकास अवघड झाले होते. आरोपी हा मागील ७ वर्षापासून स्वत:चे आस्तित्व लपवून फरार असल्याने पथकाने कोणताही धोका न पत्करता नांदीवली परिसरांत एका घरामध्ये कलरचे काम करायचे असे चित्र निर्माण करून त्याच्या ओळखीच्या इसमामार्फत आरोपीस रंगाचे काम करण्यासाठी बोलावून घेवून शिताफीने ताब्यात घेतले.

आरोपीस कक्ष कार्यालयात आणून त्याची विचारपूस केली असता त्याने प्रथम उडवाउडवीची उत्तरे दिली. परंतू पोलीस पथकाने आरोपीकडे सतत वेगवेगळया क्लुप्त्या वापरून चौकशी केली असता त्यानेच आजीचा खून केल्याचे निष्पन्न झाले. आरोपीकडे अधिक तपास केला असता मयत आजीने आरोपीच्या दुसऱ्या प्रेमविवाहांस नकार दिला होता. तसेच आजी दुसऱ्या पत्नीस सतत आरोपीविरूध्द भडकवत असल्याने रागाच्या भरात आरोपीने हाताने तिचा गळा दाबून खुन करून पळून गेला असल्याचे सांगितले. सदर आरोपीस पुढील कायदेशिर कार्यवाहीसाठी पवई पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे. सदरची यशस्वी कारवाई मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. मिलिंद भारंबे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. एस. विरेश प्रभू, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१) गुन्हे शाखा, श्री. नीलोत्पल, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पश्चिम) श्री. अलकनुरे यांचे मार्गदर्शनाखाली, कक्ष -१० चे पोलीस निरीक्षक महेशकुमार ठाकूर, सपोनि. धनराज चौधरी, सपोनि गणेश तोडकर, पोह / थारगळकर, पोह /शेटे आणि पोना /रमेश नलावडे यांनी पार पाडली.

### पेल्हार पोलीस ठाणे यांची कामगिरी - चार

करण्यात आला होता. सदरील गुन्हयाच्या अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाची तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदार यांच्या मार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी १) सरवर फतेह मोहम्मद खान यास दि. १६/११/२०२१ रोजी अटक करुन त्याच्याकडून मिळालेल्या माहितीचे आधारेत्याचा साथीदार २) वासिफ साबिर अली यास प्रतापगड, उत्तरप्रदेश येथुन ताब्यात घेवुन अटक केली आहे. नमुद अटक आरोपी कडून गुन्हयातील चोरीस गेलेली महेंद्रा बोलेरो कंपनीची कार तसेच गुन्हा करतेवेळी वापरत असलेली मारुती सुझुकी कंपनीची स्विप्ट कार असा एकुण- २,९६,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे . तसेच नमुद आरोपी यांनी वालीव पोलीस ठाण्यात दाखल असेलेला गुन्ह्याची कबुली दिली असून आरोपींवर अजून मुंबई शहर, उत्तरप्रदेश, छत्तीसगड येथे चोरीचे गुन्हे दाखल आहेत.सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पो.उप.नि/ सनिल पाटील, पोहवा टी. जी. माने, पो.ना. टी. एस. चव्हाण, प्रताप पाचुंदे, नामदेव ढोणे, पो. अं. संदिप शेळके, सचिन बळीद, रोशन पुरकर, बी. एस .गायकवाड, किरण आव्हाड, मोहसिन दिवाण, यांनी केली आहे.

### गायींची कत्तल करून गोमांस विकणारी

सदर प्रकरणी चौकशीअंती , मोटार ट्रक मालक व त्याचे अन्य साथीदार यांनी आपसांत संगणमताने कोणताही शासकीय परवाना जवळ नसताना ट्रकमध्ये सुमारे २१०१८ किलोग्रॅम वजनाचे सुमारे २०,६०,८२६/-रुपये किंमतीचे गोवशांचे मांस अनाधिकृतरित्या कोठेतरी कत्तल खाण्यामध्ये जनावरांची निर्दयीपणे कत्तल करुन महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा कलमांचे विनीर्दीष्ट केलेल्या ठिकाणी सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र धारण न करता निर्दयी पध्दतीचा वापर करुन गोवशांची हत्या करुन त्यांचे मांस तळोजा येथे घेवून जाण्यासाठी सरकारी यंत्रणेस बफेलाबिफ (म्हैशीचे मटण) असल्याचे खोटी माहिती देवुन त्याचे ई-वे बिल तयार करुन ते ई वे बिल खोटे असल्याचे माहित असतांना ते खरे आहे सांगुन सरकारी यंत्रणेची फसवणूक केली असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याबाबत दिनांक.०४/१२/२०२१ रोजी कासा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच सदर गुन्ह्यातील ४ आरोपींना अटक करून सुमारे २१०१८ किलोग्रॅम वजनाचे सुमारे २०,६०,८२६/-रुपये किंमतीचे गोवशांचे मांस व २०,००,०००/- रुपये किंमतीचा मोटार ट्रक असा एकुण- ४०,६०,८२६/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.नमुद गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक श्री. आशिष पाटील, स्थानिक गुन्हे शाखा बोईसर युनिट हे करीत आहे. सदरची कामगिरी श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक पालघर, यांचे सुचनेप्रमाणे श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री. अजय वसावे, स्थानिक गुन्हे शाखा पालघर, पोलीस उप निरीक्षक श्री. आशिष पाटील, स्थानिक गुन्हे शाखा बोईसर युनिट, व स्थानिक गुन्हे शाखा बोईसर युनिटचे पोलीस अमंलदार यांनी केली आहे.

### वरळी सिलेंडर स्फोटात बाळाच्या

सिलेंडरचा स्फोट झाला होता. जखमींना तातडीने नायर रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले होते. सिलेंडर ब्लास्टमध्ये चार जण गंभीररीत्या जखमी झाले होते. त्यातील दुर्घटनेत चिमुरड्याचा मृत्यू अवघ्या 1 दिवसात झाला. त्यानंतर बाळाचे वडील आनंद पुरी यांचा आज उपचारादरम्यान मृत्यू झाला. आता आनंद पुरी यांच्या पत्नी विद्या आनंद पुरी यांचा देखील मृत्यू झाला. गेल्या सहा दिवसांपासून त्यांच्यावर कस्तुरबा रुग्णालयात उपचार सुरू होते. तर या स्फोटामध्ये जखमी पाच वर्षीय मुलाची प्रकृत्ती सध्या स्थिर आहे. नायर हॉस्पिटल डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे तीन जणांचा हकनाक बळी गेला आहे. या घटनेमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे. काय आहे प्रकरण? बीडीडी चाळीतील एका खोलीमध्ये 30 नोव्हेंबर गॅस सिलेंडरचा स्फोट झाला होता. यामध्ये चार महिने वय असलेल्या एका बाळासह 5 वर्षे वयाचा मुलगा, एक महिला (वय वय 25) आणि एक पुरुष (वय 27) असे चौघे जण भाजले होते.

### शिवसेना मोठा निर्णय घेण्याची

घडामोड पाहायला मिळू शकते, असे जाणकारांचे म्हणणे आहे. राष्ट्रीय राजकारणात काँग्रेसला वगळून तिसरी आघाडी उभारण्याचा काही पक्षांचा प्रयत्न असला तरी शिवसेनेचे मात्र यावर वेगळे मत आहे. भाजपला आव्हान द्यायचं असेल तर काँग्रेसला वगळून राष्ट्रीय स्तरावर कोणतीही आघाडी प्रभावी ठरू शकत नाही. तिसरी, चौथी, पाचवी अशा कितीही आघाड्या उभ्या राहिल्या तर त्याचा फायदा भाजपलाच होईल, असे विधान खुद्द संजय राऊत यांनी केलेले आहे.



## संपादकीय...

## राज्य सरकारकडून विद्यार्थ्यांची ‘शाळा’

अगदी काल-परवापर्यंत परदेशात फैलावलेल्या ओमायक्रॉनने भारतातच नव्हे, तर महाराष्ट्रातही शिरकाव केला आहे. त्यासाठी केंद्र सरकारने राज्य सरकारांना सतर्क राहण्यास सांगितले. त्यानुसार सर्वसामान्यांवर निर्बंध लादण्यासाठी कायम तत्पर असलेल्या राज्यातील महाविकास आघाडी सरकारने लागलीच नवीन नियमावली जारी केली. अलीकडेच लोकलसाठी अनिवार्य केलेला युनिव्हर्सल पास आता बेस्ट बस, रिक्षा, टॅक्सी व अन्य वाहतूक सेवेसाठी आवश्यक केला. विशेष म्हणजे, याबाबत राज्य सरकारला सल्ला देणारे सरकारी बाबू कशा प्रकारे विचार करतात, हे कळण्याच्या पलीकडे आहे. आधी लोकलसाठी युनिव्हर्सल पास सक्तीचा होता, पण बाकीच्या सार्वजनिक वाहतूक किंवा इतर वाहतूक सेवेसाठी त्याची सक्ती नव्हती! लोकलने प्रवास केल्यावर कोरोना होतो आणि इतर वाहतूक माध्यमांतून केल्यावर धोका नसतो, असाच काही तरी तर्क यामागे दिसतो. पण आता सर्वत्र सक्ती आहे, किमान कागदोपत्री तरी!

केंद्र असो वा राज्य सरकार नागरिकांची सुरक्षितता ही सर्वोच्च स्थानी असायला पाहिजे, याबाबत कोणाचेही दुमत नसणार; पण त्याचबरोबर नागरिकांचे हित कशात आहे, हे पाहणे देखील सरकारचीच जबाबदारी आहे. महाराष्ट्राचा विचार करता सध्या तीन खात्यांमध्ये नेमके काय सुरू आहे, हेच कळत नाही. गृह खात्याच्या मंत्र्यावर वसुलीचा आरोप झाल्याने राजीनामा द्यावा लागला. दरम्यानच्या काळात मुंबईचे माजी पोलीस आयुक्त फरार घोषित करण्यात आले होते. परिवहन खात्यातही अशीच अनागोंदी दिसते. युनिव्हर्सल पासचा कुठे आणि कसा उपयोग करायचा, याचे स्पष्ट निर्देश नाहीत. त्यामुळे हा पास जवळ बाळगला तरी, तो प्रत्येक ठिकाणी दाखवावा लागतोच, असे नाही. रेल्वे, मॉल, रिक्षातही त्याची मागणी होत नाही. शिवाय, एसटीच्या संपाचा तिढा परिवहन विभागाकडून सुटलेला नाही. तिसरे खाते म्हणजे शिक्षण. या खात्याने गेल्या वर्षीपासून घोळ घातला आहे. दहावी परीक्षा घेणारच, असे सांगता सांगता, ती रद्द करून सरासरीने मुलांना गुण प्रदान केले. त्यांच्या गुणवत्तेचा कस लागेल, असे कोणतेही नियोजन शिक्षण खाते आणि परीक्षा मंडळाकडे नव्हते.

आता राज्य सरकारने १ डिसेंबरपासून प्राथमिक शाळा सुरू करण्याची घोषणा केली होती. पण ओमायक्रॉनबाबत केंद्राकडून सतर्कतेचा इशारा मिळताच, ही तारीख राज्य सरकारने पुढे ढकलली. आता मुंबई आणि काही जिल्ह्यांमधील शाळा १० किंवा १५ तारखेला सुरू करण्यात येतील, असे आता तरी जाहीर केले आहे. या दिलेल्या तारखांना देखील शाळा सुरू होणार का, याबाबत पालकांच्या मनात साशंकता आहे. जे विषय प्रत्यक्ष शिकवण्याची गरज आहे, तिथे ऑनलाइनचा प्रयोग सुरू आहे. ऑनलाइन शिक्षणासाठी स्मार्टफोन आणि इंटरनेटची गरज असते. एका पाहणीनुसार राज्यातील साठ ते सत्तर टक्के मुलांकडे इंटरनेट नसल्याचे समोर आले आहे. ग्रामीण, दुर्गम भागात स्मार्टफोन आणि इंटरनेटअभावी अनेक मुले शिक्षणापासून वंचित झाली आहेत. मग या मुलांनी काय करायचे?

याशिवाय, शाळांमधील सामूहिक शिक्षणाचे देखील फायदे असतात. ऑनलाइन क्लासमध्ये शिक्षकांना प्रत्येकावर लक्ष ठेवणे अशक्य असते, यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती अपेक्षेप्रमाणे होत नसल्याचेही आढळले आहे. प्रत्यक्ष शिक्षणाच्या तुलनेत ऑनलाइन शिक्षण तेवढे प्रभावी, परिणामकारक ठरत नाही. शाळांमध्ये मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास देखील घडत असतो. प्रत्यक्ष संपर्कातून, संवादातून शिक्षण देण्याबरोबर व्यक्तिमत्त्व विकसित होण्याची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रक्रिया घडत असते. पण या ऑनलाइन पद्धतीमुळे मुले एकलकोंडी बनण्याचा धोका आहे. या मुलांचे व्यक्तिमत्त्व फुलण्याऐवजी खुरटण्याची शक्यता अधिक आहे. ज्यांच्या हाती स्मार्टफोन आला आहे, ते त्यातच रमले आहेत. विद्यार्थ्यांना मोबाईलचे व्यसन लागण्याचा धोका निर्माण झाला. यातून मुलांना बाहेर काढण्याची गरज आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे या दोघांनीही जनतेला हेच सांगितले की, ‘यापुढे आपल्याला कोरोनाला सोबत घेऊनच जगायचे आहे.’ मग शासकीय यंत्रणा इतकी गलथान कशी? इतकी बेपर्वा कशी? मुलांच्या भवितव्याशी सर्रास खेळ सुरू आहे. एकेकाळी महाराष्ट्र शिक्षण मंडळाचा असलेला दरारा देखील आता राहिलेला नाही. आता जो तो दिल्ली बोर्डाला प्राधान्य देत आहे. याबाबत कोणताही खेद वा खंत शिक्षण विभागाला नाही.

गेली दोन वर्षं राज्यात अशी अभूतपूर्व स्थिती असताना, शिक्षण विभाग काहीच करू शकलेला नाही. पंतप्रधान आणि स्वत:च्या मुख्यमंत्र्यांनी वास्तवतेची करून दिलेली जाणीवही यांच्या लक्षात आलेली नाही, असे समजायचे का? या दोन वर्षांत शिक्षण विभागाने आणि मंडळाने केले काय? पारंपरिक शिक्षणाला ऑनलाइन हा तात्पुरता पर्याय होता, ती त्या वेळेची गरज होती. पण आता जर ऑनलाइवरच भर द्यायचा असेल, तर हे शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी साजेसा अभ्यासक्रम शिक्षण मंडळाने तयार केला का?

# युगपुरुषाचा आठवणी



देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात आणि मिळालेल्या स्वातंत्र्याचा सुयोग्य पद्धतीने आस्वाद घेणे सुकर ठरावे, यासाठी अनेकांनी अपार परिश्रम घेतले. आज आपला देश जगातला ‘लोकशाही असणारा प्रचंड मोठा देश’ अशी ओळख मिरवतो, तो या सर्वांच्या उत्तुंग कर्तृत्वाच्या बळावर. या सर्व नररत्नांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव अग्रक्रमानं घ्यावं असं आहे. न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक म्हणून त्यांनी देशासाठी बजावलेली भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण होती आणि आजही आहे. त्यांनी दूरदृष्टीने आखून दिलेल्या वाटेवरूनच आजही आपला देश मार्गक्रमण करत आहे. जातीव्यवस्थेच्या विरोधात लढा देणाऱ्या या बाणेदार व्यक्तिमत्त्वाच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या कार्याची महती पुन्हा एकदा जाणून घेणं आणि ती नवीन पिढीपर्यंत पोहोचवून आदरांजली व्यक्त करणं गरजेचं आहे.भारत हा कृषीप्रधान देश. आजही त्याची ही ओळख बदललेली नाही. त्या काळात उत्पन्नाची तुटपुंजी साधनं उपलब्ध असताना, तर शेती हाच सर्वसामान्यांच्या उदरनिर्वाहाचा एकमेव आधार होता. त्यामुळे डॉ. आंबेडकर यांनी शेतीसंबंधीचे विचार अतिशय स्पष्टपणे मांडलेले दिसतात. त्यांनी शेती व्यवसायाचा संबंध समाजव्यवस्थेशी जोडला होता. ग्रामीण भागातल्या जातीवर आधारित समाजव्यवस्थेचं कारण त्यांनी ग्रामीण आर्थिक व्यवस्थेमध्ये शोधलं होतं. त्यामुळेच जातीवर आधारित समाजव्यवस्था बदलण्यासाठी शेतीमध्ये परिवर्तन घडवावं लागेल, असं ते म्हणत. शेतीला उद्योग मानून, पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला पाहिजे, हे त्यांचे विचार सुस्पष्ट होते. शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला, तर शेतमजूर आणि शेतीशी निगडित सर्वच घटकांना या आर्थिक सक्षमतेचा फायदा होईल, असं त्यांचं म्हणणं होतं. आर्थिक स्रोत तळागाळापर्यंत झिरपले, तर ग्रामीण माणसाच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडतील आणि हे बदल सामाजिक परिवर्तनासाठी पोषक ठरतील, असं त्यांनी सांगितलं होतं. आर्थिक विषमता ही जातीयव्यवस्थेला पूरक आणि पोषक ठरते. आर्थिक विषमता कमी होईल, तितकी जातीय भेदभावाची दरी कमी होईल, असं त्यांना वाटत होतं. आज इतक्या वर्षांनंतरही त्यांच्या या मतांवर सखोल विचार होण्याची गरज सहज लक्षात येण्याजोगी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतीविषयक सर्वात महत्त्वाची संकल्पना मांडली ती ‘शेतीचं राष्ट्रीयीकरण’ करण्याची. शासनाने शेतजमिनी ताब्यात घेऊन विकसित कराव्यात. अशा विकसित शेतजमिनी शेतकऱ्यांना काही अटींवर कसण्यासाठी द्याव्यात, असे त्यांचे विचार होते. हा एका अर्थाने सामुदायिक शेतीचाच प्रयोग होता. अशी शेती करण्यासाठी शासनाने अधिनियम बनवावेत. पीकपद्धती, पाणी उपलब्धता, बांधबंदिस्ती, उत्पादकता वाढ, साठवण व्यवस्था, शेतमालाची विक्री, शेतमालाचे भाव या संदर्भात स्पष्ट नियम करावेत, असं त्याचं म्हणणं होतं. यामुळे कोणत्याही एकाच पिकाखाली मोठं क्षेत्र येऊन, शेतमालाच्या उपलब्धतेत विषमता येणार नाही, असा त्यांचा विचार होता. मागणी तसा पुरवठा, या अर्थशास्त्रीय नियमानुसार शेतमालाला रास्त भाव मिळेल, त्याचबरोबर अतिरिक्त उत्पादन टळून शेतमालाचं नुकसानही टळेल, अशी त्यांची धारणा होती. शेतीसाठी अधिनियम आणि कायदा असावा, ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संकल्पना शेतकऱ्यांसाठी किती मोलाची आहे, हे अधोरेखित होतं.

डॉ. बाबासाहेबांनी या देशाला दिलेलं सर्वात मोठं योगदान म्हणजे भारतीय संविधान होय. त्यांनी कॉन्स्टिट्यूअंट असेंब्लीपुढे सर्वप्रथम राज्यघटना सादर केली. त्याआधी त्यांनी जगातल्या अनेक घटनांचा अभ्यास केला होता. या पार्श्वभूमीवर भारतीय राज्यघटनेसंबंधी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना ते म्हणाले होते, ‘अमेरिकेत अध्यक्षीय स्वरूपाचं सरकार आहे. तिथे अध्यक्षच प्रमुख असतो. एवढंच नाही, तर प्रशासन प्रमुखही असतो. त्या देशात मंत्रिमंडळाऐवजी सेक्रेटरीएट आहे. हे सेक्रेटरीएट अध्यक्षांना बऱ्याचशा सूचना करत असते; परंतु अमेरिकेच्या अध्यक्षांना या सूचना बंधनकारक नसतात. सेक्रेटरीएटचं ऐकलंच पाहिजे, असं बंधन अध्यक्षांना नाही; परंतु भारतीय राज्यघटनेच्या संदर्भात अध्यक्ष आणि मंत्री असतील तसंच अध्यक्षाला मंत्र्यांच्या सूचना स्वीकाराव्या लागतील. हे मंत्रिमंडळ बहुसंख्य असल्यानं त्यांच्या सूचना अध्यक्षांना स्वीकाराव्या लागतील, अशी तरतूद भारतीय राज्यघटनेत राहील. अमेरिकेतील घटनेत कार्यकारी मंडळ आणि सदन, असेंब्ली या वेगवेगळ्या मानल्या गेल्या आहेत. मात्र, भारतीय राज्यघटनेत तसं नाही आणि राज्यघटनेला ते मान्यही नाही. इथे कार्यकारी मंडळातले सदस्य पार्लमेंटचे सदस्य असतात. तेच मंत्री होऊ शकतात, असं भारतीय राज्यघटनेत नमूद आहे. हे लोकशाही पद्धतीचं निदर्शक आहे’. संविधानात दोन बाबींचा उल्लेख आहे. त्यासंबंधी डॉ. बाबासाहेब म्हणतात की, भारतीय संविधानात राष्ट्राच्या दृष्टीने स्थिरता आणि जबाबदारी या दोन्ही बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, अमेरिकेत दोन प्रकारचं नागरिकत्व असतं. एक म्हणजे देशाचं नागरिकत्व आणि दुसरं म्हणजे राज्याचं नागरिकत्व; परंतु डॉ. बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेत एकच नागरिकत्व असेल, असं नमूद केलं. त्या संदर्भात ते म्हणाले होते, ‘देअर इज ओन्ली वन सिटिझनशिप फॉर दी होल ऑफ इंडिया’. अमेरिका आणि भारतीय राज्यघटनेतला हा फरक आपण लक्षात घ्यायला पाहिजे. त्यावेळी ‘आपल्या नव्या राज्यघटनेत नवं काय आहे’, असाही प्रश्न टीकाकारांनी विचारला होता. त्यांचं म्हणणं होतं की, ब्रिटिशांच्या १९३५च्या कायद्याचीच ही नक्कल आहे. एवढंच नाही, तर यात अनेक राष्ट्रांच्या राज्यघटनेतून काही मुद्दे घेतले आहेत. त्यामुळे यात नवं असं फारच थोडं आहे, असा टीकाकारांचा आक्षेप होता. त्याला उत्तर देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, आपल्या देशाचे प्रश्न इतर देशांपेक्षा वेगळे आहेत. म्हणून आंधळेपणानं इतर देशांची नक्कल केली, हे म्हणणं योग्य नाही. प्रत्येक देशाने मूलभूत अधिकार मान्य केले आहेत. कारण मूलभूत अधिकाराशिवाय कोणत्याही देशात राज्यघटना प्रमाणीभूत मानली जात नाही. म्हणूनच भारतीय राज्यघटनेतही मूलभूत अधिकार आहेत. त्यामुळे या संदर्भात कुणाचं अनुकरण केलं, असं म्हणणं चुकीचं आहे. घटनात्मक नैतिकता ही सर्व जगात समान आहे, हेही लक्षात घेतलं पाहिजे.टीकाकारांचा एक आक्षेप असाही होता की, भारतीय राज्यघटनेने प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेचा विचार अमलात आणायला हवा होता. ग्रामीण व्यवस्थेचा विचार करण्यापेक्षा प्राचीन भारतीय समाजव्यवस्था लक्षात घ्यायला हवी होती. या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेलं स्पष्टीकरण लक्षात घेण्यासारखं आहे. ते म्हणाले होते, ‘ग्रामव्यवस्थेचा अधिक्याने विचार करणं हे नव्या भारताच्या दृष्टीनं योग्य होणार नाही. कारण ग्रामीण व्यवस्था ही अजूनही अज्ञानाचं माहेरघर, संकुचित आणि जातीयवादी आहे. अशा ग्रामीण व्यवस्थेचं पोषण आणि पुरस्कार टीकाकारांना करायचा आहे का? म्हणून असा विचार मसुदा समितीने मांडलेला नाही. ग्रामरचनेपेक्षा व्यक्तिस्वातंत्र्य आणि व्यक्तीचं महत्त्व घटनेत मान्य केलं आहे’. टीकाकारांच्या मते राज्यघटनेत केली गेलेली मध्यवर्ती सरकार आणि प्रांतिक सरकार, अशी विभागणी नको होती; परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ही मागणी अमान्य केली, त्यामुळे राज्यघटनेत मध्यवर्ती सरकारला फार महत्त्व देण्यात आलं. अन्यथा, या प्रांतिक सरकारांनी स्वतंत्र राष्ट्राचा विचारच केला नसता. प्रांतिक सरकारांवर मध्यवर्ती सरकारचा अंकुश राहावा, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका होती. अशा अनेकानेक संदर्भांद्वारे स्वतंत्र भारताची राज्यघटना विचारपूर्वक आणि राष्ट्र उभारणीसाठी सुयोग्य अशी असल्याचं त्यांनी खंबीरपणे सांगितलं होतं.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रेरणादायी सर्वोत्तम स्मारक नवी मुंबईत

## पालकमंत्री ना.श्री.एकनाथ शिंदे





नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने साकारण्यात आलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील सर्व दालने ही अत्यंत उत्कृष्ट असून त्यामधून बाबासाहेबांच्या महनीय व्यक्तित्वाची अनुभूती स्मारकाला भेट देणा-या प्रत्येकाला लाभेल असे सांगत महाराष्ट्र राज्याचे नगरविकास व सार्वजनिक बांधकाम (सार्व. उपक्रम) मंत्री तथा ठाणे जिल्हा पालकमंत्री ना.श्री.एकनाथ शिंदे यांनी आंतरराष्ट्रीय स्तराच्या सर्वोत्तम सुविधा असणाऱ्या या प्रेरणादायी स्मारकातून प्रत्येकाला बाबासाहेबांच्या विचारांची ऊर्जा लाभेल असा विश्वास व्यक्त केला.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सेक्टर 15, ऐरोली येथे उभारण्यात आलेल्या भव्यतम स्मारकातील वातानुकूलीत अद्ययावत सभागृह, ध्यान केंद्र ( Meditation Center ), 'ई लायब्ररी' सुविधेसह समृध्द ग्रंथालय, अत्याधुनिक ऑडिओ सुविधेसह जीवन प्रवास दर्शविणारे माहितीपूर्ण छायाचित्र दालन, आभासी चलचित्र विशेष कक्ष (Holographic Presentation) अशा विविध सुविधांच्या लोकार्पण समारंभप्रसंगी पालकमंत्री ना. श्री. एकनाथ शिंदे आपले मनोगत व्यक्त करीत होते. याप्रसंगी व्यासपीठावर ठाणे लोकसभा सदस्य खा.श्री.राजन विचारे, महापालिका आयुक्त श्री. अभिजीत बांगर, महाराष्ट्र शासनाच्या झोपडपट्टी सुधार मंडळाचे अध्यक्ष श्री. विजय नाहटा, शासनाच्या वडार समाज समन्वय समितीचे अध्यक्ष श्री. विजय चौगुले आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

बाबासाहेबांच्या अगाध ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंवर अभ्यासपूर्ण भाष्य करीत समर्थ राज्यघटनेच्या माध्यमातून कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही व सामाजिक न्याय प्रस्थापित होईल अशाप्रकारे समाजावर केलेल्या बाबासाहेबांच्या आभाळाएवढ्या ऋणातून उतराई होणे शक्य नाही असे सांगत पालकमंत्री महोदयांनी हे स्मारक त्यादृष्टीने एक प्रयत्न आहे अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाण दिनापूर्वी या स्मारकातील पूर्ण झालेल्या सुविधा नागरिकांकरिता खुल्या व्हाव्यात ही अनेकांची मोठ्या प्रमाणावर मागणी होती, त्यास अनुसरून महापरिनिर्वाण दिनाच्या एक दिवस आधी पूर्वसंध्येला या सुविधांचे लोकार्पण करता आले याबद्दल समाधान व्यक्त करताना पालकमंत्री ना.श्री.एकनाथ शिंदे यांनी स्मारकातील सुविधा महापरिनिर्वाण दिनापूर्वी गुणात्मक दर्जा राखून पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम घेणारे महापालिका आयुक्त श्री. अभिजीत बांगर आणि अभियंत्यांसह त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे कौतुक केले. यावेळी पालकमंत्री महोदयांच्या शुभहस्ते आयुक्त श्री. अभिजीत बांगर यांच्यासह शहर अभियंता श्री. संजय देसाई, अतिरिक्त शहर अभियंता श्री. शिरीष आरदवाड, कार्यकारी अभियंता श्री. गिरीश गुमास्ते, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. प्रवीण गाढे आणि सहकारी अभियंते, वास्तुविशारद, बांधकाम कंत्राटदार यांचा विशेष सन्मान करण्यात आला. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना ठाणे लोकसभा सदस्य खासदार श्री. राजन विचारे यांनी स्मारकातील अद्ययावत स्वरुपाचे ग्रंथालय व त्यामधील अत्याधुनिक ई लायब्ररी सुविधा तसेच चरित्रात्मक छायाचित्र दालन, आंतरराष्ट्रीय होलोग्राफिक प्रणालीद्वारे बाबासाहेबांचे भाषण प्रत्यक्ष बघण्याची सुवर्णसंधी, प्रशस्त ध्यानकेंद्र व सभागृह अशा प्रकारच्या सुविधा असणारे हे देशातील सर्वोत्तम स्मारक आहे असे मत व्यक्त केले. यापुढील काळात नवी मुंबईत नवनवे लोकोपयोगी प्रकल्प राबविण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.महापालिका आयुक्त श्री. अभिजीत बांगर यांनी प्रास्ताविकपर मनोगतात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या आधी स्मारकातील विविध सुविधा जनतेसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या ही ख-या अर्थाने बाबासाहेबांप्रती व्यक्त केलेली आदरांजली आहे व आजचा दिवस भाग्याचा आणि अभिमानाचा आहे असे सांगत येथील इ-लायब्ररीसह अत्याधुनिक ग्रंथालय, जीवन प्रवास दर्शविणारे छायाचित्र दालन, बाबासाहेब प्रत्यक्ष संवाद साधत आहेत असे होलोग्राफीक प्रेझेन्टेशन, मन:शांती देणारे ध्यानकेंद्र, वैचारिक सामाजिक कार्यक्रमांसाठी अद्ययावत सभागृह अशा विविध सुविधा पुरविताना त्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या होतील याकडे कटाक्षाने लक्ष पुरविण्यात आले असल्याचे सांगितले.


या स्मारकातील प्रत्येक सुविधा बाबासाहेबांच्या महनीय व्यक्तीमत्वाला साजेशी होईल असा प्रयत्न करण्यात आला असून यामध्ये विशेषत्वाने छायाचित्रांच्या माध्यमातून बाबासाहेबांचा जीवन प्रवास साकारताना प्रत्येक पॅनलची उंची सर्वसामान्य माणसाच्या दुप्पट ठेवलेली आहे. ज्यामधून आपल्याला बाबासाहेबांसारख्या महनीय व्यक्तिमत्वाची महानता लक्षात येते विशेष विश्लेषण आयुक्तांनी केले. याप्रसंगी छायाचित्र दालन ऐतिहासिक माहितीदृष्ट्या परिपूर्ण होण्यात महत्वपूर्ण योगदान देणा-या अंतर्गत सुविधा समितीचा विशेष सत्कार करण्यात आला. यामध्ये समितीचे कार्याध्यक्ष श्री. विजय सुरवाडे, श्री. योगीराज बागुल, श्री. रमेश शिंदे, श्री. अनिल सवादकर, श्री. दादाभाऊ अभंग या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र अभ्यासक सदस्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे या समितीचे उपाध्यक्ष श्री. संजु वाडे, सदस्य श्रीम. हेमांगी सोनावणे, श्री. जी.एस.पाटील, श्री. सिद्राम ओहाळ यांनाही सन्मानित करण्यात आले. हे छायाचित्र दालन साकारणारे सजावटकार श्री. समीर माळवदे व श्री. सचिन अडसूळ यांचाही सन्मान करण्यात आला.अशाच प्रकारे स्मारकातील ग्रंथालय परिपूर्ण होण्यासाठी विशेष योगदान देणारे लेट्स रीड फाऊंडेशनने ग्रंथालय संगणकीयदृष्ट्या अद्ययावत होण्यासाठी तसेच इ-लायब्ररीमधील इ-बुक, ऑडिओ बुक, व्हिडिओज् अशा सुविधा परिपूर्ण होण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेस विनामूल्य केलेल्या सहकार्याबद्दल विशेष सन्मानित करण्यात आले.

या स्मारकामध्ये असलेला आभासी चलचित्र विशेष कक्ष एक अत्यंत महत्वाचे आकर्षण असून यामध्ये प्रत्यक्ष बाबासाहेबांचे भाषण होलोग्राफीक प्रेझेन्टेशनव्दारे बघण्याचा रोमांचकारी अनुभव घेता येणार आहे. याप्रसंगी पालकमंत्री महोदयांच्या शुभहस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे सुप्रसिध्द सुलेखनकार श्री. अच्युत पालव यांनी चितारलेल्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. नवी मुंबई शहरातीलच नव्हे देशातील एक उत्कृष्ट स्मारक म्हणून नावाजले जाईल अशा प्रकारे स्मारकातील सुविधा असल्याचे मत पालकमंत्री ना. श्री. एकनाथ शिंदे यांच्यासह सर्व मान्यवर आणि नागरिकांनी व्यक्त केलेले असून यामुळे नवी मुंबईच्या नावलौकीकात लक्षणीय भर पडलेली आहे.

पोलीस
बातमी पत्र
पोलीस बातमी पत्र



# पत्नीने सोनोग्राफीसाठी पैसे मागितले, नवऱ्याकडून लेकीची हत्या




ठाणे : पैशांवरुन पत्नीशी वाद झाल्यानंतर नराधम पित्याने पोटच्या मुलीची हत्या केली. त्यानंतर विष पिऊन स्वतःचाही जीव देण्याचा प्रयत्न बापाने केला. सात वर्षीय मुलीचा मृत्यू झाला, तर आरोपी पित्याचा जीव वाचला आहे. ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा परिसरात ही घटना घडली. आरोपी बाप अनीस मालदार याच्या विरोधात गुन्हा दाखल करुन पोलिसांनी अधिक तपास सुरु केला आहे.

अनीस मालदार आपली पत्नी सोफिया आणि सात वर्षांच्या मुलीसोबत मुंब्रा बाजार भागातील बॉम्बे कॉलनीत असलेल्या अरसद मंजीलमध्ये राहत होता. तो मजुरी करायचा, मात्र त्याला जुगार खेळण्याची वाईट सवय जडली होती.

**काय आहे प्रकरण?**

पत्नी सोफिया नोकरी करुन कुटुंबाचं पोट भरण्यासाठी हातभार लावत होती. आर्थिक देवाणघेवाणी वरुन अनीस मालदार आणि सोफिया या दाम्पत्यामध्ये अनेक वेळा वाद विवाद झडत असत.

**पैसे मागितल्याने भांडण**

सोनोग्राफी करण्यासाठी गुरुवारी रात्री सोफियाने पती अनीसकडे पैशांची मागणी केली. मात्र त्याने पैसे नसल्याचं सांगत तिला स्पष्ट नकार दिला. त्यावर तिने मला सोड, आणि मुलीसोबत वेगळा रहा, असा इशारा दिला.

**मुलीची हत्या करुन आत्महत्येचा प्रयत्न**

बायकोचा पवित्रा पाहून अनीसचा तळतळाट झाला. त्याने रागाच्या भरात सात वर्षांच्या मुलीलाच जोरजोराने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर दत्तूवाडी परिसरात जाऊन त्याने मुलीची गळा दाबून हत्या केली. त्यानंतर स्वतःही विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.

# 'त्या' महिला दुकानात आल्या अन् काही क्षणांतच...; CCTV मध्ये घटना कैद



कल्याण: कल्याणजवळील द्वारली गावात चोरट्या महिलांचा सुळसुळाट सुरू झाला आहे. महिलांनी एका दुकानामधील वस्तू चोरून पोबारा केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. या प्रकरणी उल्हासनगरच्या हिललाइन पोलीस ठाण्यात दुकानदाराने तक्रार केली आहे. कल्याणमधील द्वारली गावात गुरूनाथ पावशे यांचे गावदेवी स्टील मार्ट आहे. या दुकानात काही महिला आल्या होत्या. या महिलांनी दुकानातील शेगड्या घेऊन पळ काढला. पाच महिलांची ही टोळी असल्याची माहिती दुकानदार पावशे यांनी दिली. या प्रकरणी पावशे यांनी उल्हासनगरच्या हिललाइन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ या शहरांमध्ये चोरीच्या घटनांचे प्रमाण वाढले आहे. तर दुसरीकडे ग्रामीण भागात सुद्धा आता चोऱ्या होऊ लागल्या आहेत. कल्याणजवळील द्वारली गावातील गुरुनाथ पावशे यांच्या गावदेवी स्टील मार्टमधून शेगड्या घेऊन महिला चोरट्यांनी पोबारा केला आहे. महिलांची पाच जणींची टोळी असल्याचे दुकानदाराचे म्हणणे आहे. चोरीची संपूर्ण घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. त्यामुळे आता या महिला चोरट्यांना जेरबंद करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. द्वारली गावात याआधीही जिल्हा परिषद शाळेजवळ असलेल्या एका दुकानामधून खाद्य तेलासह अन्य साहित्य घेऊन एका चोरट्याने पोबारा केला होता. आता द्वारली गावात पुन्हा एकदा महिलांची टोळी सक्रिय झाल्याचे दिसते.

# कफ सिरपमधून अमली पदार्थ



कोडेन फॉस्पेट हा अमली पदार्थ मिसळून कफ सिरपची नशेसाठी विक्री करणाऱ्या तरुणाला मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथकाने डोंगरी येथून अटक केली. अर्शद अक्रम शेख असे त्याचे नाव असून, त्याच्याकडून अमली पदार्थमिश्रित कफ सिरपच्या तब्बल साडेतीन हजार बाटल्या हस्तगत केल्या आहेत. अर्शद मुंबई, तसेच उपनगरांत नशेसाठी या सिरपचा पुरवठा करीत असल्याचे पोलिसांच्या तपासातून समोर आले आहे. अमली पदार्थविरोधी पथकाचे पोलिस उपायुक्त दत्ता नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली घाटकोपर यूनिटच्या प्रभारी पोलिस निरीक्षक लता सुतार, सहायक निरीक्षक फरीद खान, उपनिरीक्षक पालवे, भालेराव, चिकणे यांच्या पथकाने माझगावच्या इंदिरानगर चाळीतून अर्शदला ताब्यात घेतले. त्याच्याकडे कोडेन फॉस्पेटमिश्रित कफ सिरपच्या १२० बाटल्या सापडल्या. अर्शद हा मुंबईच्या कानाकोपऱ्यांत कफ सिरपच्या बाटल्यांचा पुरवठा करीत असल्याने त्याची कसून चौकशी करण्यात आली.

# परमबीर सिंह यांना अटकेची धाकधूक, सुप्रीम कोर्टाकडून मुदतवाढ मिळणार?

मुंबई : माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह (Param Bir Singh) यांना राज्य सरकारने अखेर सेवेतून निलंबित केले आहे. या कारवाईनंतर परमबीर सिंह यांना अटकेची धाकधूक वाढली आहे. कारण 6 डिसेंबरपर्यंत अटक न करण्याची सर्वोच्च न्यायालयाची मुदत संपत असल्यामुळे उद्या पुन्हा दिलासा मिळतो का, याकडे लक्ष आहे. निलंबनाची प्रत परमबीर सिंह यांनी स्वीकारली आहे. त्यामुळे परमबीर सिंह यांना सुप्रीम कोर्टाकडून दिलासा मिळाला नाही, तर त्यांच्यावर अटकेची कारवाई होऊ शकते, अशी पोलीस वर्तुळात चर्चा आहे.

परमबीर यांच्यावर पाच गुन्हे दाखल

परमबीर सिंग यांच्यावर मुंबई आणि आणि ठाण्यात खंडणी आणि जातीवाचक शिवीगाळ तसेच इतर अनेक आरोपांखाली गुन्हे दाखल आहेत. सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने परमबीर सिंग यांना खंडणी आरोप प्रकरणात अटकेपासून संरक्षण दिले. त्याचवेळी न्यायलयाने त्यांना तपासात सहभागी होण्याचेही आदेश दिले.

काय आहे प्रकरण?



परमबीर सिंग यांच्याविरोधात एका पोलीस अधिकाऱ्यानेच तक्रार केली होती. खोट्या एफआयआरच्या माध्यमातून आपला छळ केल्याचा आरोप करत अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत पोलिस निरीक्षक भीमराज घाडगे यांनी एफआयआर दाखल केली होती.

काय होते आरोप?

'परमबीर सिंग हे ठाण्याते पोलिस आयुक्त असताना कल्याण-डोंबिवली महापालिकेतील बिल्डरांच्या एका भ्रष्टाचार प्रकरणातील अनेक आरोपींची नावे वगळण्याच्या त्यांच्या दबावाला मी बळी पडलो नाही. म्हणून माझ्याच विरोधात अनेक खोटे एफआयआर दाखल करायला लावून त्यांनी माझी प्रचंड छळवणूक केली. शिवाय अंतिमत: न्यायालयाच्या निकालाने माझी निर्दोष मुक्तता झालेल्या एका प्रकरणात मला नाहक 14 महिने तुरुंगवास भोगावा लागला' असा आरोप करत पोलिस निरीक्षक भीमराज घाडगे यांनी परमबीर सिंग यांच्या विरोधात एफआयआर दाखल केला होता.

सचिन वाझेच्या अटकेनंतर परमबीर सिंह अडचणीत

मनसुख हिरेन हत्या आणि अंबानच्या घराबाहेर स्फोटकं ठेवल्याच्या आरोपात सचिन वाझेला अटक झाल्यानंतर परमबीर सिंह यांची बदली करण्यात आली होती. त्यानंतर परमबीर सिंह आणि तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यात आरोप प्रत्यारोप सुरू झाले. परमबीर सिंह यांनी माजी गृहमंत्री अनिल देशमुखांनी सचिन वाझेला 100 कोटींच्या खडणीचे टार्गेट दिल्याचा आरोप परमबीर सिंह यांच्याकडून करण्यात आला होता.

# आठ वर्षात 12 महिलांना लग्नाचं आमिष, मुंबईतील भामट्याला अटक



मुंबई : लग्न करुन आयुष्यभराच्या जोडीदाराची निवड करण्यासाठी ऑनलाईन मॅट्रिमोनियल वेबसाईटचा सर्रास वापर केला जातो. मात्र काही जण अशा माध्यमांचा वापर करुन महिलांची फसवणूक करत असल्याचा प्रकार समोर आला आहे.

मुंबई पोलिसांच्या सायबर सेल अधिकाऱ्यांनी एका आरोपीला अटक केली आहे. त्याने 2013 पासून आत्तापर्यंत 12 महिलांची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

आरोपीने पीडित महिलांकडून लाखो रुपयांची फसवणूक केली. महिलांना लग्नाचं खोटं आमिष दाखवून त्यांची आर्थिक लूट केल्याचं सामोर आहे.

**नको तिथे डोकं लावलं**

पोलिसांच्या अटकेत असलेल्या आरोपीचं नाव सतीश गरुड आहे. सतीश गरुड हा क्रिमिनल सायकोलॉजी आणि एल एल बीच्या शेवटच्या वर्षाची परीक्षा देणार होता, मात्र आपल्या ज्ञानाचा आणि बुद्धीचा वापर तो महिलांना फसवण्यासाठी करत होता.

लग्नाचे आमिष दाखवून त्याने एकूण 12 महिलांची फसवणूक केली आहे. एवढंच नव्हे तर त्याने पीडित महिलांकडून लाखो रुपयेही घेतले असल्याचे तपासात समोर आले आहे.

**तिशीवरील महिला टार्गेट**

या प्रकरणात सायबर पोलिसांनी जेव्हा तपास सुरू केला तेव्हा त्यांना असं दिसून आला की पीडित महिलांचं वय 30 वर्ष पेक्षा जास्त आहे किंवा त्यांचा घटस्फोट झाला आहे. अशाच महिलांना आरोपी फसवून त्यांना लुटत होता.. अत्यंत गोड बोलून तो महिलांना आपल्याकडे आकर्षित करायचा आणि त्यांची लुबाडणूक करायचा.

ऑनलाईनचा वापर वाढत असल्याने सध्या मॅट्रिमोनिअल साईटचा वापर लोक लग्न जुळवून घेण्यासाठी करत आहेत. त्यात मोठ्या संख्येत महिलांची फसवणूक होण्याचे प्रकार वाढले असून महिलांनी अशा वेळी सावध राहणाची गरज आहे, असं आवाहन मुंबई पोलिसांतर्फे सर्वसामान्य लोकांना केलं गेलं आहे.

# दारुसाठी पैसे न दिल्याच्या रागातून एकाची हत्या, 12 तासांत आरोपींना बेड्या

ठाणे : दारुसाठी दिलेल्या पैशाच्या वादातून बाचाबाची झाल्याने लोखंडी रॉडने मारहाण करुन एकाची हत्या (Murder Case) केल्याची धक्कादायक घटना ठाण्यात घडली आहे. पोलिसांनी तपास करत अवघ्या 12 तासात आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. कळवा खरेगाव येथे शुक्रवारी एक अज्ञात तरुण मृतावस्थेत पडल्याची माहिती कळवा पोलिसांना (Kalwa Police) मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असता मयताच्या शरीरावर मारहाण केल्याचा जखमा आढळून आल्या. त्यानंतर पोलिसांनी अज्ञातांच्या विरोधात गुन्हा नोंद करत तपासाला सुरुवात केली.

मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी आणि आरोपी कोण याची माहिती मिळवण्यासाठी कळवा पोलिसांनी 2 पथकं तयार केली. तपासादरम्यान पोलिसांना मृत व्यक्ती हा कळव्याच्या इंदिरानगर परिसरात राहणारा असल्याचं समजलं. त्याचं नाव गुलाम सलामत शेख असे नाव असल्याचे कळालं. त्यानंतर पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली. हत्येच्या 12 तासांच्या आत पोलिसांनी 3 जणांना ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता त्या तीन्ही आरोपींनी गुन्हा कबूल केला. आकाश पळस, सनी सोनकर आणि फैजल खान अशी या तीन आरोपींची नावं आहेत. हे तीन्ही आरोपी कळव्याच्या इंदिरानगर परिसरातील आहेत. आरोपी आणि मयत यांच्यात दारूच्या पैशावरून बाचाबाची झाली आणि या बाचाबाचीचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपींनी मयत गुलाबला लोखंडी पाईपने मारहाण केली होती आणि त्यातच त्याचा मृत्यू झाल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.




**महामार्गावर वाहनांना लुटणार टोळी गजाआड**

दुसरीकडे मुंब्रा पनवेल महामार्गावर गेल्या काही दिवसांपासून वाहन चालकांना लुटण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत.

# अल्पवयीन मुलीचा गर्भपात करणाऱ्या डॉक्टराला अटक

प्रियकर आणि प्रेयसीतील शारीरिक संबंधांचे चित्रीकरण सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन प्रियकराने आणि त्याच्या मित्राने संबंधित अल्पवयीन मुलीवर वारंवार बलात्कार केला. त्यातून ती मुलगी गर्भवती राहिल्यानंतर एका खासगी रुग्णायलयात तिचा गर्भपात करण्यात आला. हा प्रकार समोर आल्यानंतर पोलिसांनी बलात्कार करणाऱ्या दोन जणांना आणि पोलिसांना माहिती न देता गर्भपात करणाऱ्या एमडी डॉक्टरला अटक केली आहे. या प्रकरणी एका सोळा वर्षीय मुलीने फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या दोन आरोपींवर बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

त्या मुलीचा १८ वर्षीय प्रियकर, त्याचा मित्र आणि डॉक्टरवर गुन्हा दाखल करून त्या तिघांना अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ वर्षीय आरोपी आणि पीडित मुलीचे दोन वर्षांपासून प्रेमसंबध होते. ऑगस्ट महिन्यात आरोपी आणि पीडित मुलगी वडगाव शेरीतील एका अर्धवट बांधकाम झालेल्या इमारती गेले होते. तेथे त्यांच्यात शारीरिक संबध प्रस्थापित झाले.

हा प्रकार दुसऱ्या आरोपीने पहिला. त्यानंतर 'इमारतीत असणाऱ्या सीसीटीव्हीमध्ये तुमचे चित्रीकरण झाले आहे. ते सोशल मीडियावर व्हायरल करीन,' अशी धमकी देऊन दुसऱ्या आरोपीने पीडित मुलीवर बलात्कार केला. तो आरोपी अत्याचार करीत असताना मुलीच्या प्रियकराने त्याचे मोबाइलमध्ये चित्रीकरण केले.



त्यानंतर त्या दोघांनी बलात्काराचा व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन पीडित मुलीवर वारंवार अत्याचार केले.

या दरम्यान पीडित मुलगी गर्भवती राहिली. त्या मुलीला त्रास होऊ लागल्याने आईने खासगी रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरने पोलिसांना या घटनेची माहिती न देता परस्पर गर्भपात केला. हा प्रकार समोर आल्यानंतर पोलिसांनी संबंधितांना अटक केली.

पोलिस निरीक्षक (गुन्हे ) विजयसिंह चव्हाण तपास करीत आहे.

# हरवली आहे



## नाव: डॉ. स्वदिच्छा मनीष साने

(Third Year MBBS at GGMC and JJ HOSPITAL MUMBAI)

वय: २२ वर्षे

पत्ता: खोली क्र.१०१/१०२, A विंग, श्रीनिवास CHS, खोदराम बाग, बोईसर (पश्चिम)-४०१५०१.

तिचा फोन नंबर: 9028208999, 9359237764.

बोईसर येथून जे जे कॉलेज ला PSM प्रिलिम परीक्षेला जात असताना बेपत्ता झाली आहे.

कपड्याचा रंग - हिरवट-पिवळसर रंगाचा टी-शर्ट, काळया रंगाची चप्पल आणि जांभळ्या रंगाची बॅग आहे.

उंची: ५'३, रंग : गोरा व अंगाने बारीक.

वजन:४५ किलो

शेवटचा कॉल - १०:५८ वा,सकाळी .

शेवटचा मेसेज व्हॉट्सअॅप टेक्स्ट वरून - ०१:३९.वा दुपारी.

शेवटचे मोबाईल लोकेशन - वांद्रे (Bandra) Mumbai.

२९ नोव्हेंबर, ०१:२९ वा. दुपारी. [पोलिसांच्या माहिती नुसार].

**वडील: मनीष साने- ९२०९२२२२५३ / ९४२२८९५१४७.**

**भाऊ: संस्कार साने - ८४४६६९४६६६**

**NOTICE**

We parents (Rasheed Tasleem Ansari) & (Shaista Rasheed Ansari) have changed our son's name from Arsalaan abdul Rasheed Ansari to Mohammed Arsalaan Ansari. For Passport related work

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्क:-9594418181 / 8424989898